भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR) प्रायोजित

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९


दि. २ व ३ फेब्रुवारी २०१९

2018-19

# अर्थवेध

(स्मरणिका)













बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित

**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर**

Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

मुख्य संपादक

डॉ. सुनिल शिंदे

Scanned with CamScanner

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९

दि. २ व ३ फेब्रुवारी २०१९

# अर्थवेध

स्मरणिकेत सहभागी लेख

परिषद आयोजक
डॉ. जोबी जॉर्ज
प्राचार्य

मुख्य संपादक
डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभागप्रमुख


### सल्लागार मंडळ

डॉ. श्रीनिवास खांदेवाले
डॉ. दि. व्य. जहागिरदार
डॉ. अंजली कुलकर्णी
डॉ. स्नेहा देशपांडे
डॉ. आर. वाय. माहोरे
डॉ. संजय धनवटे
डॉ. रामक्रिष्णा टाले
प्रा. के. ई. पाटील

### संपादक मंडळ

डॉ. मंगेश कडू
डॉ. विजय दिघारे
डॉ. राजेश बहुरूपी
डॉ. मोतीराज चव्हाण
डॉ. राहिल कुरेशी
प्रा. सोमेश्वर वासेकर
डॉ. मधुकर नंदनवार
डॉ. अनिता महावादीवार
प्रा. आदित्य सारवे
डॉ. नितीशा पाटनकर
डॉ. सारंग धोटे
प्रा. अमित काळबांधे
डॉ. विनिता विरगंधम


Scanned with CamScanner

# अर्थवेध

स्मरणिका

ISBN 978-81-935528-5-8

विदर्भ अर्थशास्त्र शिक्षक परिषद ४३ वे वार्षिक अधिवेशन

प्रकाशक

- प्राचार्य डॉ. जोवी जॉर्ज
  बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित
  भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जिल्हा नागपूर

प्रकाशन

- आकाश पब्लिकेशन, महाल, नागपूर
  सी.डी. शिवणकर
  मो.नं. ९८२२५६५७८२
  ई-मेल : aakar100@gmail.com

मुखपृष्ठ

- डॉ. सुनिल शिंदे

अक्षर जुळवणी

- स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

प्रायोजक

- भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR)

- बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित
  भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जिल्हा नागपूर द्वारे आयोजित केलेल्या
  मराठी अर्थशास्त्र परिषद ४३ व्या अधिवेशनातील शोधनिबंधाचे संकलन

प्रसिध्द होणाऱ्या स्मरणिकेतील लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात. यामध्ये संपादक व कार्यकारी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

Scanned with CamScanner

# अणुक्रमणिका

## प्रथम सत्र : भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा


१. भारतातील जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. जे.व्ही. गायकवाड ........ १५

२. जागतिकीकरण आणि भारत — डॉ. अर्चना बी. जैन ........ १८

३. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. नागोराव के. सोरे, कु. पायल विनोद भोयर ........ २२

४. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात — डॉ. सिद्धार्थ सुखदेव मेश्राम ........ २६

५. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : जागतिकीकरणानंतर कृषीक्षेत्रातील यशापयश — प्रा. दिलीप पांडुरंग महाजन, डॉ. राजेंद्र रामराव गव्हाळे ........ ३२

६. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — डॉ. (सौ.) मंजुषा राजेंद्र टाकरे ........ ३६

७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — सुनिल प्रभाकर घुगल ........ ४०

८. जागतिकीकरण - भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान — डॉ. दिपक को. शृंगारे, प्रा. निलेश म. मोहकार ........ ४५

८. जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील उपलब्धी व मर्यादा — डॉ. विजय बनकर, डॉ. श्रीकृष्ण बोढे ........ ४९

१०. जागतिकीकरण आणि भांडवलशाही — डॉ. शमापरवीन सरफराज खान ........ ५२

११. जागतिकीकरणाचे बदलते स्वरूप व आवश्यकता — डॉ. संजय धनवटे ........ ५३

१२. जागतिकीकरण व भांडवल प्रवाहाचा परिणाम — संतोष मोहदरे ........ ५७

१३. जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था — डॉ.जे.एम. काकडे, प्रा. रविंद्र बा. शेंडे ........ ६१

१४. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम — डॉ. करमसिंग राजपूत ........ ६४

१५. जागतिकीकरण-शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या — डॉ. ममता राममिलन साहु ........ ६८

१६. जागतिकीकरण आणि भारतीय शेतीचे अपयश — प्रा. डॉ. प्रतिभा एस. काळमेघ ........ ७०

१७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने ........ ७३

१८. जागतिकीकरणात कृषी क्षेत्राचा विकास व सद्यस्थिती — प्रा. डॉ. संजय. जे. कोठारी ........ ७९

१९ जागतिकीकरणाच्या प्रकिया — डॉ. अजय नानाजी सरटकर, रेणू ए. तिवारी ........ ८३

२०. जागतिकीकरणाचे आर्थिक व सामाजिक पैलू — प्रा. डॉ. जे. एस. हटकार ........ ८४

२१. जागतिकरण आणि ग्रामीण अर्थ व राजकारण — डॉ. राजेश संतोषराव बहुरुपी ........ ८६

२२. जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर होणारे परिणाम — प्रा. राधेश्याम मानकर, प्रा. सुनिता निठोरी रविदास ........ ८९


## द्वितीय सत्र : सार्वजनिक क्षेत्राची यथार्थता


२३. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील यथार्थता — प्रा. डॉ. चुन्नीलाल प. साखरवाडे ........ ९१

२४. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे बुडीत कर्जाचे वाढते प्रमाण व विलिनीकरण — डॉ. सु.रा. जगताप ........ ९३

२५. सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील अनुत्पादक मालमत्ता एक समस्या — प्रा. एन.ए. पिस्तुलकर, प्रा. यु.डी. चव्हाण ........ ९७

२६. भारताच्या आधारभूत विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका — डॉ. ईश्वर जनार्धन वाघ ........ १००

२७. भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राचे योगदान — सुभाष ज्ञा. गोटफोडे ........ १०४


Scanned with CamScanner

# भारताच्या आधारभूत विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका

❑ डॉ. ईश्वर जनार्धन वाघ
(अर्थशास्त्र विभाग)
श्रीमती राजकमल बाबूराव तिडके महाविद्यालय, मौदा

**सारांश :**

भारताची वर्तमान अर्थव्यवस्था ही खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राच्या सहअस्तित्वातून बनली आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारतातील बहुतांश उद्योग खाजगी क्षेत्रात होते. परंतु स्वातंत्र्यानंतर विशेषतः भारतात आर्थिक नियोजन सुरू झाल्यानंतर १९४८ ते १९५६ ची औद्योगिक धोरणे घोषित करण्यात आली. त्यानंतर भारतात औद्योगिक विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका व्यापक बनली आहे. या संदर्भात प्रो. एस. खेरा असे म्हणतात की, आज राज्य (सरकार) आर्थिक प्रक्रियेचा निष्क्रीय पर्यवेक्षक नसून तो क्रियाशील भागीदार आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राची भूमिका नागरिकाचा संरक्षक, नियंत्रणकर्ता, प्रगत उद्यमी या दृष्टीने महत्वाची आहे. भारतात हे सार्वजनिक क्षेत्र राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवर वर्गीकृत झाले आहे. सार्वजनिक क्षेत्राची भूमिका भाडंवल निर्मिती, आदर्श नियंत्रक, निर्यात प्रोत्साहन व आयात प्रतिस्थापन याद्दष्टीने महत्वाची राहीली आहे. पायाभूत सुविधाचा विकास करणे, देशामध्ये मजबूत औद्योगिक आधार निर्माण करणे, वेळोवेळी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शिक्षणाचा प्रसार करणे या दृष्टीकोनातून सार्वजनिक क्षेत्राची भूमिका अत्यावश्यक आहे. परंतु देशातील उपलब्ध बचत सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून एकत्रित करण्यात हे क्षेत्र असमर्थ ठरत आहे. असे असले ती देशातील जनतेच्या कार्यक्षमतेचा वापर अशा पध्दतीने करावयाचा की, ज्यामुळे सर्वांना आनंद मिळेल. हा आनंद खाजगी क्षेत्र उपलब्ध करून देऊ शकत नाही म्हणून सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण ठरत आहे.

**प्रस्तावना :**

भारतामध्ये सार्वजनिक विकास ही नवीन संकल्पना नाही. आजपासून २००० वर्षापूर्वी भारतामध्ये सार्वजनिक उद्योग कार्यरत होते. प्राचीन काळामध्ये उद्योग आणि व्यापारामध्ये राज्याच्या हस्तक्षेपाला अवांछनीय मानले जात होते. त्यामुळे असा समज होता की, जनतेच्या जीवनामध्ये किंवा विकासामध्ये राज्याने कमीत कमी हस्तक्षेप करणे, यातच समाजाचे सर्वात मोठे हित आहे. कारण त्यावेळी राज्याचे कार्य केवळ देशात शांतता व सुरक्षितता एवढेच मानले जात होते. भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्राचा खरा विकास स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झाला. यामध्ये खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राच्या सीमारेषा ठरवून देण्यात आल्या. व्यापार आणि उद्योग यामध्ये सरकारचे प्रत्यक्ष योगदान ही एक आधुनिक घटना मानली जाते. यापूर्वी सरकारचे कार्य रक्षा, शान्ती व जनकल्याण या पूरतेच सिमित होते.

१९५६ च्या औद्योगिक धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेत एक महत्वाचे स्थान प्राप्त झाले. ह्याचे मुख्य कारण स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारत हा एक अल्पविकसित असा देश असून त्याचा औद्योगिक आधार अत्यंत कमकुवत होता. साधारणतः असा समज होता की, ज्या देशाचा राजा व्यापार करतो तो देश नष्ट होतो. परंतु हळुहळु या विचारधारेत दोष निर्माण झाले. म्हणूनच प्रो. एस. खेरा असे म्हणतात की, आज राज्य (सरकार) आर्थिक प्रक्रियेचा निष्क्रीय पर्यवेक्षक नसून तो क्रियाशील भागीदार आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राची भूमिका नागरिकाचा संरक्षक, नियंत्रणकर्ता, प्रगत उद्यमी या दृष्टीने महत्वाची आहे. श्रमिकांचे शोषण, स्त्रियांचे शोषण, मोठया उद्योजकांची मक्तेदारी, उपभोक्त्याचे शोषण, सपंत्तीचे असमान वितरण, असंतुलित क्षेत्रीय विकास, रष्ट्रीय सूरक्षा, देशात आधारभूत उद्योगाचा अभाव, लालफितीशाही, भ्रष्ट्राचार, राजकीय पूंजीवाद यासारख्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने खाजगी क्षेत्र पूर्णपणे अपयशी ठरले आहे. अशाप्रसंगी अर्थव्यवस्थेच्या आधारभूत विकासाकरिता एका बड्या धक्क्यांची गरज होती. परंतु खाजगी क्षेत्राजवळ एवढया मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध नसल्यामुळे असा बडा धक्का देण्यास खाजगी क्षेत्र असमर्थ होते. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि वैयक्तिक दबावापासून राज्याचे संरक्षण सार्वजनिक क्षेत्राशिवाय कुणीही करू शकत नाही, अशी विचाराधारा निर्माण झाली. यातुनच खऱ्या अर्थाने सार्वजनिक क्षेत्राच्या विकासाला प्रारंभ झाला.

**सार्वजनिक क्षेत्राचा अर्थ :**

ज्या क्षेत्रावर सरकारची मालकी आहे किंवा ज्यांचे व्यवस्थापन व संचालन सरकारी यत्रंणेद्वारे केले जाते किंवा मालकी, व्यवस्थापन व संचालन या तिन्ही बाबी सरकारकडेच

ISBN 978-81-935528-5-8

Scanned with CamScanner

असतात. अशा क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्र असे म्हणतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**


प्रस्तुत शोधनिबंध खालील उद्दिष्ट्ये समोर ठेवून अभ्यास केला आहे.

१) सार्वजनिक क्षेत्राची परिभाषा जाणून घेणे.

२) सार्वजनिक क्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिकेचे विश्लेषण करणे.

**सार्वजनिक क्षेत्राची रचना :**

देशाच्या सामान्य सरकारी क्षेत्रामध्ये सर्व खाजगी संस्था, संघटना, भावी उपक्रम समाविष्ट असतात. अधिवेशनानुसार सर्वसाधारण सरकारी क्षेत्रामध्ये सर्व सार्वजनिक कॉरपोरेशन्स समाविष्ट आहेत. जे त्यांच्या विक्रीच्या किमान ५०% किंमतीला व्यापून घेण्यास सक्षम नाहीत आणि म्हणूनच त्यांना नॉन-मार्केट उत्पादक मानले जाते.




**भारताच्या आधारभूत विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका :**

खाजगी क्षेत्रातील एकाधिकारी प्रवृत्ती नष्ट करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून देशाला प्रगतीपथावर नेणे, विदेशी मदतीपासून देशाला मुक्त करणे ही उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार होणे आवश्यक आहे. यादृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका मांडता येते.

**सार्वजनिक क्षेत्र आणि आधारभूत उद्योग :**

भारताच्या आधारभूत संरचनेच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची राहीली आहे. आधारभूत उद्योगात लोह, इस्पात, इंजीनियरिंग वस्तू, जड वस्तू परिवहन सेवा, सिंचन, शिक्षण, कृषी, रसायन व उर्वरक उद्योग यांचा समावेश होतो. या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्राला अजिबात रूची नसते. सार्वजनिक क्षेत्राचा विचार केल्यास या क्षेत्राने पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक केली आहे. म्हणजेच मजबूत औद्योगिक आधाराची बांधणी करून, सार्वजनिक क्षेत्राने भावी शीघ्र औद्योगिक विकासाची मार्ग मोकळा केला आहे. वेगवेगळया पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुक ही खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| योजना | संगटित औद्योगिक क्षेत्र | सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणुक | सार्वजनिक क्षेत्राचा प्रतिशत हिस्सा |
|---|---|---|---|
| प्रथम | ३९८ | ६० | १६% |
| द्वितीय | १६२० | ७७० | ४७% |
| तृतीय | २६०५ | १३३० | ५१% |
| चतुर्थ | ५३०० | ३०५० | ५८% |
| पाचवी | १६००० | १०,२०१ | ६२% |
| सहावी | ५०,७३० | २०,४०७ | ४०% |
| सातवी | १०४,६२७ | ४२,४५५ | ४०% |
| आठवी | २२७,००० | ७५६,०० | ३३.३ |
| नववी | ५०१,९०० | ७१,६८४ | १४.३ |

**सार्वजनिक क्षेत्र आणि भाडंवल निर्मिती :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक क्षेत्राचा मिश्र घरेलू भाडंवल निर्मितीमध्ये ३.५ टक्के वाटा होता. तो सातव्या योजनेत १२.१ टक्क्यापर्यंत वाढला. याच कालावधीत खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्राने मिळून केलेल्या भाडंवल निर्मितीत सार्वजनिक क्षेत्राचा वाटा ४७.५३ टक्क्यापर्यंत वाढलेला होता. परंतु गेल्या काही वर्षात सार्वजनिक क्षेत्र उपलब्ध बचतीचा पूर्णपणे वापर करण्यात असमर्थ ठरले आहे. १९५१ ते १९५६ या कालावधीत मिश्र घरेलु बचतीचा दर १.७ टक्के होता तो सातव्या योजनेत तो २४.४ टक्के झाला. परंतु अकराव्या योजनेत हा दर ५.६ टक्केपर्यंत कमी झाला आहे.

**सार्वजनिक क्षेत्र आणि आयात-निर्यात :**

आयात प्रतिस्थापनेच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. स्वातंत्र्यापूर्वी कृषी आणि औद्योगिक मालाच्या बाबतीत आपण दुसऱ्या देशावर अवलंबून होतो. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र सार्वजनिक क्षेत्राने टोकाची भूमिका घेतल्यामुळे भारत हेवी इलेक्ट्रीकल्स, भारत इलेक्ट्रानिक्स, इंडियन ऑईल कारर्पोरेशन, ऑईल ॲन्ड नॅचरल गॅस कमिशन, हिंदुस्थान ॲटिबायोटिक्स. या ३० महामंडळे निर्माण झाली. त्यामुळे या महामंडळाच्या माध्यमातून अनेक वस्तूचे उत्पादन

ISBN 978-81-935528-5-8


Scanned with CamScanner

भारतातच झाल्यामुळे परदेशी चलनाची बचत झाली. त्याचप्रमाणे निर्यात वाढीमध्ये सुध्दा सार्वजनिक क्षेत्राने महत्वाची भूमिका बजावली आहे. १९७८-७९ मध्ये सार्वजनिक क्षेत्राद्वारे एकुण १८३४.१६ कोटी रूपयाची निर्यात केली गेली तर २०००-०१ मध्ये हा आकडा १९,७१४ कोटी रूपयापर्यंत पोहचला. त्यामुळे विदेशी चलनाची टंचाई कमी झाली. त्यामुळे निर्यात प्रोत्साहन व आयात प्रतिस्थापनाच्या दृश्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे.

**अर्थव्यवस्थेचा आदर्श नियंत्रक :**

भारतामध्ये मौद्रीक, राजकोषीय, औद्योगिक धोरण, लाइसंस राज प्रणाली फारशी यशस्वी ठरली नाही. देशातील निम्न भाडंवलदर, उपयुक्त व्यावसायिक वातावरणाचा अभाव, विदेशी भाडंवलावर अवलंबित्व या कारणामुळे सार्वजनिक क्षेत्राचे महत्व वाढले आहे. खाजगी क्षेत्रामुळे कामगारांचे, कर्मचाऱ्यांचे आर्थिक, मानसिक व शारिरीक शोषण होण्याची भिती असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला आदर्शपणे नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे.

**सरकारी कोषामध्ये योगदान :**

सरकारच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्र महत्वाचे आहे. १९६०-६१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात सार्वजनिक क्षेत्राचा हिस्सा ०.९ प्रतिशत होता तो वाढून १५ प्रतिशतपर्यंत पोहचला. याशिवाय सार्वजनिक क्षेत्राचे योगदान लाभांश, उत्पादन कर, आयात-निर्यात कर, कंपनी कर इ. स्वरूपात आहे. सहाव्या पचंवार्षिक योजनेत हे योगदान २७५७० कोटी रू. एवढे होते.

**रोजगार क्षेत्रातील योगदान :**

भारतात सार्वजनिक क्षेत्रामुळे रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहे. १९६४-६५ मध्ये सार्वजनिक क्षेत्राद्वारे ४ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला तर २००१ पर्यंत २४२ सार्वजनिक क्षेत्राद्वारे १७.४२ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. २०१३ मध्ये सार्वजनिक क्षेत्रामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या १४.०४ लक्ष होती. आधुनिक काळाचा विचार करता सार्वजनिक क्षेत्राने रोजगार निर्मितीकडे फारसे लक्ष केंद्रींत न केल्यामुळे रोजगाराची गती मंद झाली आहे. आधुनिक काळाची गरज लक्षात घेता सार्वजनिक क्षेत्र रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. देषातील युवाशक्तीचा पूरेपूर फायदा घेण्याच्या दृष्टीने, पारदर्शक रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, तरूणांना ज्ञानाच्या संधी उपलब्ध करून देणे, स्वयं रोजगाराची संधी उपलब्ध करणे याहष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे.

**सार्वजनिक क्षेत्र आणि अनुसंधान :**

सार्वजनिक क्षेत्राला नियोजनाच्या प्रक्रियेतील यशाचे सहाय्यक समजला जातो. कृषी, सुरक्षा, संशोधन याहष्टीने विचार केल्यास या बाबतीत खाजगी क्षेत्राला फारशी रूची नसते. त्यामुळे या क्षेत्राचा पाहिजे त्या प्रमाणात विकास होत नाही. प्रत्येक क्षेत्रात संशोधनाचे कार्य तीव्र गतीने होण्यासाठी, वैज्ञानिक दृष्टीकोन जनतेमध्ये रूजविण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे.

**विकासाचे योगदान :**

सार्वजनिक क्षेत्राच्या उपलब्धी शिवाय विकास साधने अशक्य आहे. क्षेत्रीय विषमता कमी करण्यासाठी, सर्वांगीण विकासाची संकल्पना राबविण्यासाठी, आर्थिक सत्तेचे प्रजातंत्रीकरण करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. आधुनिक काळातील कार्याचा व्याप, तांत्रिक क्षमता आणि मानवी संसाधनाचा परिपूर्ण वापर यांच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास विकासामध्ये सार्वजनिक क्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे.

**सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगसंस्थाचा विकास**

| अ. क्र. | वर्ष | उद्योग संस्थाची संख्या | एकुण गुतंविलेले भाडंवल (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | ५ | २९ |
| २ | १९६१ | ४७ | ९५० |
| ३ | १९८० | १७९ | १८,१५० |
| ४ | १९९० | २३३ | ९९,३३० |
| ५ | २००१ | २३४ | २,७४,११८ |
| ६ | २००७ | २१६ | ४,२१,०८९ |
| ७ | २००८ | २१४ | ४,५५,३६७ |
| ८ | २००९ | २१३ | ५,१३,५३२ |
| ९ | २०१० | २१७ | ५,७९,९२० |
| १० | २०११ | २२० | ६,६६,८४८ |
| ११ | २०१२ | २२५ | ७,२१,२२८ |
| १२ | २०१३ | २३० | ८,४५,३३४ |
| १३ | २०१४ | २३४ | ९,९२,९७१ |

(संदर्भ : भारतीय अर्थव्यवस्था- प्रा. जिभकाटे, डॉ. सुधाकर शास्त्री)

**सार्वजनिक क्षेत्र आणि शिक्षण :**

शिक्षण हा कोणत्याही देशाच्या विकासाचा महत्वाचा

आधारस्तंभ आहे. यातूनच संपूर्ण देशाची आर्थिक प्रगती साधने शक्य होते. त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. शिक्षण क्षेत्र जर खाजगी क्षेत्राकडे सोपविले तर समाजाचे आर्थिक शोषण होण्याची शक्यता असते. म्हणून शासनाने शिक्षणाचे बाजारीकरण होऊ न देता सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करणे आवश्यक आहे. शिक्षणाची खरी फळे समाजाला उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे.

**निष्कर्ष :**

अर्थव्यवस्थेचा राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तरावरील विकासाची प्रक्रिया प्रामाणिक व पारदर्शक करण्यासाठी, सुरक्षा, अवजड उद्योग, संशोधन, तंत्रज्ञान इत्यादीचा विकास करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे. परंतु देशातील उपलब्ध बचत एकत्रित करण्यात व त्याचा योग्य, पारदर्शक विनियोग करण्यात सार्वजनिक क्षेत्र हे असमर्थ ठरत आहे. खाजगी क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे सार्वजनिक क्षेत्राचे अपंगत्व वाढत चाललेले आहे.

**संदर्भसूची :**

१. माथुर, पी. एल, आर्थिक प्रशसन, अर्जुन पब्लीशिंग हाऊस, नई दिल्ली - ११०००२
२. जिभकाटे बी. एल, शास्त्री सुधाकर, भारतीय अर्थव्यवस्था, विश्व पब्लिशर्स, नागपूर -४४००३२
३. साठे मधुसुदन, भाडंवल बाजार आणि व्यापार, डायमन्ड पब्लीकेशन पुणे - ३०
४. योजना जुलै २०१६
५. योजना मार्च २०१७

★★★

ISBN 978-81-935528-5-8 

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर



ISBN 978-81-935526-5-8